




# दैनिक जनसंचलन

निडर निर्भिड

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!






संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे अंक : ३७५ वा बुधवार दि २७ मे २०२६ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# मोदी-फडणवीसांवर टीका करताना सपकाळांनी स्वतःची उंची लक्षात ठेवावी! - आ. डॉ. संजय कुटे यांचा घणाघात

**जनसंचलन बुलढाणा**

काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याविषयी केलेल्या वक्तव्यावरून भाजप आक्रमक झाली असून भाजपा प्रदेश सरचिटणीस तथा आमदार संजय कुटे यांनी सपकाळांवर जोरदार निशाणा साधला आहे. स्वतःला राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे पाईक म्हणवून घेणाऱ्या सपकाळांना भाषेची आणि विचारांची मर्यादा जपता येत नसेल, तर ही महाराष्ट्राच्या संस्कृतीला काळीमा फासणारी बाब आहे, असा घणाघात डॉ. कुटे यांनी केला. महाराष्ट्राची राजकीय परंपरा ही सभ्यता, संस्कार आणि वैचारिक भूमिकांवर उभी आहे. मतभेद असू शकतात, पण वैयक्तिक टीका आणि खालच्या स्तरावरील भाषा लोकशाहीला शोभणारी नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. काँग्रेसकडून सातत्याने वैचारिक दिवाळखोरीचे प्रदर्शन सुरू असून सुजाण जनता हे कदापि सहन करणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.





भाजपच्या वतीने हर्षवर्धन सपकाळ यांच्या वक्तव्याचा जाहीर आणि तीव्र निषेध करतो, असेही डॉ. कुटे यांनी ठणकावून सांगितले.

# खेर्डा बु.मध्ये अखंड हरिनाम सप्ताहाची भक्तिमय सांगता; दिंडी व महाप्रसादाने भाविक तृप्त...

**जनसंचलन जळगाव जामोद**

तालुक्यातील खेर्डा बु. येथील श्री लक्ष्मीनारायण भगवान मंदिर परिसरात गेल्या आठ दिवसांपासून सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताह तथा संगीतमय श्रीमद भागवत कथेची सोमवारी (दि.२५ मे) भक्तिमय वातावरणात उत्साहपूर्ण सांगता करण्यात आली. महाप्रसाद, काल्याचे कीर्तन आणि भव्य दिंडी सोहळ्यामुळे संपूर्ण गाव हरिनामाच्या रंगात रंगून गेले होते. या सप्ताहात ह.भ.प. भागवताचार्य दिव्याताई मापारी खैरा आळंदीकर यांनी आपल्या सुमधुर वाणीतून श्रीमद भागवत कथेचे रसाळ निरुपण केले. दि.१८ मेपासून सुरू झालेल्या या धार्मिक सोहळ्यात दररोज पहाटे काकडा, विष्णू सहस्त्रनाम, श्रीमद भागवत कथा, हरिपाठ आणि रात्री हरिकीर्तन असे विविध कार्यक्रम भक्तिभावात पार पडले. सोमवारी सकाळी झालेल्या काल्याच्या कीर्तनाला गावासह पंचक्रोशीतील भाविकांनी मोठी गर्दी केली होती. त्यानंतर आयोजित महाप्रसादाचा हजारो भाविकांनी लाभ घेतला. सायंकाळी निघालेल्या भव्य दिंडी सोहळ्यात टाळ-मृदंगाच्या गजरात आणि हरिनामाच्या जयघोषात संपूर्ण गाव भक्तिरसात न्हाऊन निघाले. गाथा पारायणाने सप्ताहाची सांगता करण्यात आली. या सप्ताहाच्या यशस्वी आयोजनासाठी निवाणा, रुधाना, वकाना, सुनगाव, सावरगाव तसेच पंचक्रोशीतील टाळकरी मंडळींनी विशेष परिश्रम घेतले. महिला, युवक, बालगोपाल आणि ग्रामस्थांनीही मोठ्या संख्येने




सहभाग नोंदवत सेवा दिली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी हरिदास गिऱ्हे, मारुती वानखडे, दीपक येनकर, आत्माराम वानखडे, गजानन वेरुळकर, जयदेव वानखडे, परमेश्वर उगले यांच्यासह महात्मा फुले मंडळ व ग्रामस्थांनी अथक परिश्रम घेतले.

# दैनिक जनसंचलन बातमीचा जबरदस्त धडाका...

**जनसंचलन/बुलढाणा**

आधी पगार द्या, मगच काम! असा इशारा देत देऊळगाव मही ग्रामपंचायतीच्या कर्मचाऱ्यांनी सुरू केलेल्या कामबंद आंदोलनाला अखेर मोठे यश मिळाले आहे. दै जनसंचलन काही तासांपूर्वी २७ महिन्यांपासून कर्मचाऱ्यांचे पगार रखडल्याची धक्कादायक बातमी प्रसारित करताच प्रशासन खडबडून जागे झाले आणि अवघ्या काही तासांत आंदोलनावर तोडगा निघाला. २५ मे २०२६ पासून सुरू असलेल्या कामबंद व पाणीपुरवठा बंद आंदोलनामुळे ग्रामपंचायतीचे दैनंदिन कामकाज विस्कळीत झाले होते. नागरिकांमध्येही तीव्र नाराजी पसरली होती. अखेर आज २६ मे रोजी प्रशासन व कर्मचाऱ्यांमध्ये सकारात्मक चर्चा झाली. यावेळी कर्मचाऱ्यांना तत्काळ तीन महिन्यांचे पगार देण्यात आले असून उर्वरित दोन महिन्यांचे पगार व कोरोना काळातील थकीत भत्ता ५ जून २०२६ रोजी देण्यात येईल, असे लेखी आश्वासन देण्यात आल्याने आंदोलन मागे घेण्यात आले. हे आंदोलन सोडविताना प्रशासक सौ. जोत्सना वसुदेव शिंगणे, ग्रामपंचायत अधिकारी वसंतराव चेके, शेख मुस्लिम शेख अहमद, विजयराज रामकिसन शिंगणे, राजेंद्र अरुणराव शिंगणे यांच्यासह सर्व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांनी सन्माननीय रियाज का पठाण, पत्रकार सुनीलभाऊ मतकर, संतोषभाऊ जाधव तसेच ग्रामस्थांचे विशेष आभार मानले. आमच्या न्यायाच्या लढ्याला ङ्गहॅलो बुलढाणाफ्ने दिलेला आवाज निर्णायक ठरला, अशी भावना कर्मचाऱ्यांनी व्यक्त केली.

# साहेब, या जरा चौथ्या सीटवर!

पंतप्रधानांनी काटकसरीचे व इंधनबचतीचे आवाहन केल्यावर सर्व महनीय व्यक्तींनी देशाच्या आर्थिक राजधानीत आपल्या खासगी आलिशान प्रवासाला सोडचिठ्ठी देत सर्वसामान्य प्रवासी होण्याचे दर्शन घडविले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बुलेटवरून विधिमंडळात आले, त्याचीही भरपूर चर्चा रंगली. याच मालिकेत मुंबईच्या प्रथम नागरिक महापौर रितू तावडे यांनी घाटकोपर ते दादर असा एसी लोकलचा प्रवास केला आणि मान्सूनपूर्व कामांचा आढावा घेण्यासाठी बेस्ट बसने प्रवास केला. याच दरम्यान ताफ्यातील बेस्टची इलेक्ट्रिक बस बिघडली, कर्मचाऱ्यांना धक्का मारून तिला बाजूला करावे लागले व या दुरुस्तीचक्रात त्यांचा २० मिनिटे खोळंबा झाला. बेस्टचे नेमके दुखणे काय आहे, त्याचा दाहक अनुभव महापौरांना या वेळी आला असणार. पंतप्रधानांच्या आवाहनामुळे का होईना, मुख्यमंत्री, महापौर यांना सर्वसामान्यांच्या रोजच्या विवंचनांची जाणीव होणार असेल, तर चांगलेच आहे. पण साहेब,..तुमच्या अधिकाऱ्यांनाही सांगा की, जरा आमच्यासह चौथ्या सीटवरून प्रवास करून बघाच, तरच कळतील आमच्या व्यथा, अशी सर्वसामान्यांची भावना आहे. करोनानंतर आता सेकंड क्लासमध्येही चौथ्या सीटचा आग्रह कुणी धरत नाही; परंतु लोकलगाड्यांचे प्रश्न अजिबात सुटलेले नाहीत. रेल्वेपासून रिक्षांपर्यंत सर्वांना वक्तशीरपणा आणि शिस्तीचे वावडे आहे. यापूर्वी एकदा काँग्रेस अध्यक्ष राहुल गांधी यांनी मुंबईभेटीत लोकलने प्रवास केला होता. त्या वेळी राज्यात काँग्रेस सत्तेवर होती. मात्र, तरीही येथील रेल्वेप्रवाशांच्या यातना कमी झाल्याच नाहीत. जुन्या मुंबई-पुणे रस्त्याची आठ-दहा तासांची कोंडी अनुभवल्यामुळे शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी द्रुतगती महामार्ग उभारण्याची सूचना केली होती, तर मुंबई-नाशिक महामार्गावरील वाहतूक कोंडीचा फटका बसल्यावर शरद पवार यांनी नाशिकला दुहेरी घाटमार्ग तयार करण्याचे निर्देश दिले होते. या गोष्टींच्या आठवणी अनेकदा सांगितल्या जातात. याचा अर्थ नेतेमंडळी कोंडीत अडकल्यावरच महामार्ग किंवा वाहतूकसुविधा तयार होणार का? काही वर्षांपूर्वी एका तरुण पत्रकाराला बोरिवली-दहिसर चेकनाक्याजवळ दुचाकी अपघाताला सामोरे जावे लागले होते. एमएमआरडीएमधील एका धडाकेबाज सनदी अधिकाऱ्यांनी त्याची विचारपूस केल्यावर सल्ला दिला, की मुंबईत दुचाकी वापरणे अत्यंत धोकादायक असते, तुम्ही ती वापरताच कशाला? त्यावर सदर पत्रकार अवाक झाला. हद्दीच्या वादामुळे चेकनाक्यावर एकही रिक्षा मिळत नाही, त्यामुळे इतक्या कमी अंतरावर स्वस्तातला पर्याय दुचाकीचाच राहतो, ही वस्तुस्थिती त्याने कथन केली. याचा अर्थ वाहतूकसुविधांचे नियोजन करणाऱ्या अधिकाऱ्याला प्रत्यक्षात काय घडते, याचा मागमूसही नव्हता. मुंबईत नवनव्या वाहतूकसुविधांची भर पडत आहे. मात्र बेस्ट व लोकलसेवा या मुंबईवाहतुकीचा कणा असलेल्या साधनांच्या दैनंदिन परिचालनाविषयी मात्र हेळसांड सुरू आहे. सेवेचा निर्माता जोपर्यंत स्वतः वापरकर्ता होत नाही, तोपर्यंत व्यवस्थेतील यातनांवर तोडगा काढण्याची ईर्षाही त्यांच्या मनांत जागृत होणार नाही. यासाठीच सर्व



यंत्रणांच्या खातेप्रमुखांना महिन्यातून किमान एक दिवस तरी रेल्वे, बस, रिक्षा, टॅक्सी या साधनांनी प्रवास करून प्रवाशांची दुःखे जाणून घेण्याचे निर्देश द्यायला हवेत. रेल्वे, बेस्ट यांचे महाव्यवस्थापक, विभागीय व्यवस्थापक, वाहतूक पोलिस, प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी वांद्रे-कुर्ला अशी संकुले, दूरदूरची रेल्वेस्थानके, तेथील कोंडीचे परिसर येथे एकदा तरी सामान्य प्रवासी म्हणून जावे. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या दुनियेत आता आपलाच क्लोन तयार करता येतो. मुख्यमंत्री, खासदार, मंत्री यांनी आपला क्लोन तयार करून त्यास प्रवासाला पाठवावे, म्हणजे तो क्लोन तरी त्यांना खरी परिस्थिती कथन करेल; अन्यथा सार्वजनिक वाहतूक साधनांनी प्रवास करावा, असे कोरडे आवाहन म्हणजे मुंबईकरांच्या जखमेवर मीठ चोळण्यासारखेच ठरेल.




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# ‘व्हीआयपी संस्कृती’ला थारा नाही! मुख्यमंत्री जोसेफ विजय यांनी हटवला खुर्चीवरचा पांढरा टॉवेल

**चेन्नई/वृत्तसंस्था**

तामिळनाडूचे मुख्यमंत्री आणि ‘तमिळगा वेत्री कळघम’ (TVK) पक्षाचे प्रमुख जोसेफ विजय यांनी आपल्या कृतीतून एक नवा आदर्श घालून दिला आहे. एका पर्यावरणवादी कार्यकर्तीच्या आवाहनाला मान देत, मुख्यमंत्री विजय यांनी सरकारी कार्यालयांमधील ब्रिटिशकालीन ‘व्हीआयपी संस्कृती’ला (VIP Culture) मूठमाती दिली आहे. मुख्यमंत्र्यांच्या खुर्चीवर वर्षानुवर्षे ठेवला जाणारा पारंपारिक पांढरा टॉवेल विजय यांनी हटवला असून, त्यांच्या या निर्णयाचे सोशल मीडियावर जोरदार स्वागत होत आहे.

प्रसिद्ध पर्यावरणवादी कार्यकर्ती लिसिप्रीया कांगुजम (Licypriya Kangujam) हिने गुरुवारी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म ‘X’ (ट्विटर) वर तामिळनाडूचे मुख्यमंत्री विजय यांना एक आवाहन केले होते. सरकारी कार्यालयांमध्ये मंत्र्यांपासून ते अगदी कनिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत सर्वांच्याच खुर्च्यांवर पांढरा टॉवेल ठेवण्याची एक जुनी प्रथा आहे. ही ‘टॉवेल संस्कृती’ व्हीआयपी मानसिकतेचे प्रतीक असून ती बंद करण्यात यावी, अशी मागणी लिसिप्रीयाने केली होती. विजय यांनी स्वतःपासून सुरुवात करून हा बदल घडवून आणावा, असे तिने आपल्या पोस्टमध्ये म्हटले होते. या आवाहनानंतर अवघ्या २४ तासांच्या आत मुख्यमंत्री विजय



यांनी कोणतीही अधिकृत घोषणा किंवा प्रसिद्धी न मिळवता शांतपणे आपल्या खुर्चीवरून तो पांढरा टॉवेल हटवला.

या बदलाबद्दल मुख्यमंत्री कार्यालय किंवा तामिळनाडू सरकारकडून कोणतेही अधिकृत वक्तव्य आलेले नाही. मात्र, नुकत्याच झालेल्या शासकीय बैठकांच्या फोटोंमधून हा मोठा बदल समोर आला आहे.

**१४ मे रोजीची बैठक :** सचिवालय येथे झालेल्या उद्योग आणि गुंतवणूक प्रोत्साहन विभागाच्या आढावा बैठकीत मुख्यमंत्री विजय हे नेहमीप्रमाणे पांढरा टॉवेल असलेल्या पारंपारिक व्हीआयपी खुर्चीवर बसलेले दिसले होते.

**१५ मे रोजीची बैठक :** मात्र, शुक्रवारी ‘TAFE’ कंपनीच्या अध्यक्षा मल्लिका श्रीनिवासन आणि उपाध्यक्ष डॉ. लक्ष्मी वेणू यांच्यासोबत झालेल्या बैठकीचे फोटो समोर आले, तेव्हा मुख्यमंत्र्यांच्या खुर्चीवरचा तो पांढरा टॉवेल गायब होता.

“सामान्य जनतेचा आवाज ऐकणारा मुख्यमंत्री”, अशा शब्दांत लिसिप्रीया कांगुजम हिने विजय यांचे आभार मानले आहेत. सोशल मीडियावरील नेटकऱ्यांनीही हा नोकरशाही आणि राजकारणातील ‘व्हीआयपी’ थाट मोडीत काढणारा एक ऐतिहासिक आणि प्रतीकात्मक बदल असल्याचे म्हटले आहे.

### विजयकडून निर्णयांचा धडाका

अभिनेते ते नेते बनलेल्या विजय यांनी १० मे रोजी तामिळनाडूच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली आहे. त्यांच्या ‘टीव्हीके’ (TVK) पक्षाने विधानसभा निवडणुकीत सर्वात मोठा पक्ष म्हणून यश मिळवले असून, काँग्रेस आणि डाव्या पक्षांच्या पाठिंब्याने त्यांनी सरकार स्थापन केले आहे. सत्ता हातात येताच घेतलेल्या निर्णयांमुळे विजय यांनी आपण ‘सर्वसामान्यांचे मुख्यमंत्री’ असल्याचा संदेश दिला आहे.

### काय आहे या ‘पांढऱ्या टॉवेल’चा इतिहास?

भारतातील सरकारी कार्यालयांमध्ये अधिकाऱ्यांच्या आणि मंत्र्यांच्या खुर्चीवर पांढरा टॉवेल टाकण्याची प्रथा ही ब्रिटिशकालीन (Colonial Era) गुलामगिरीची आणि वर्गभेदाची आठवण करून देणारी आहे. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात ब्रिटिश अधिकारी आपल्या केसांची रचना नेटकी ठेवण्यासाठी ‘मॅकॅसर ऑइल’ (Macassar oil) नावाचे एक तेल वापरायचे. खुर्चीच्या महागड्या लेदरला किंवा लाकडाला हे तेल लागून डाग पडू नयेत, म्हणून खुर्चीच्या वरच्या भागावर कापड ठेवले जायचे. पुढे भारताच्या उष्ण हवामानामुळे या कापडाची जागा पूर्ण पांढऱ्या टॉवेलने घेतली, जेणेकरून घाम शोषला जावा.

---

## देशभरात महामार्ग बांधणीचा वेग का मंदावला?

**पुणे/वृत्तसंस्था**

पश्चिम आशियातील युद्धामुळे निर्माण झालेला ‘बिटुमिन’चा तुटवडा, वाढलेल्या किमती आणि मंत्रिमंडळ समित्यांच्या मंजुरीअभावी रखडलेल्या प्रकल्पांमुळे देशातील महामार्ग बांधणीचा वेग मंदावल्याची कबुली केंद्रीय रस्ते, वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी दिली.

गडकरी यांनी संतशिरोमणी तुकाराम महाराज पालखी महामार्गाची पाहणी केली. या दरम्यान ‘लोकसत्ता’शी संवाद साधताना पश्चिम आशियातील युद्धामुळे निर्माण झालेला बिटुमिनचा तुटवडा आणि मंदावलेल्या महामार्ग बांधणीवरही भाष्य केले.

महामार्ग उभारणीचे अनेक प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत. मात्र, महामार्ग बांधणीचा वेग आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये प्रतिदिन २५ किलोमीटरवर आला असून, त्यात सलग तीन वर्षांपासून घसरण होत असल्याकडे लक्ष वेधले असता गडकरी म्हणाले, ‘प्रकल्प पूर्ण करण्यासाठी भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणामध्ये (एनएचएआय) तीन हजार कोटी रुपये आवश्यक आहेत. आता निधीसाठीचा प्रस्ताव मंत्रिमंडळाकडे पाठवावा लागतो. त्यासाठी तीन ते चार समित्या असतात. त्यांच्याकडून परवानगी मिळाल्यानंतर प्रकल्प मंजूर व्हायला वेळ लागतो. त्यामुळे काही प्रमाणात महामार्ग बांधणीचा वेग मंदावला, हे खरे आहे. मात्र, हे सगळे प्रकल्प एकदम मंजूर होतील आणि महामार्ग बांधणीचा वेगही पूर्ववत होईल.’ युद्धामुळे बिटुमिनचा तुटवडा निर्माण झाला असून, त्याच्या किमतीतही मोठी वाढ झाली आहे. त्यामुळे महामार्गांच्या कामाचा वेग संथ होण्याबरोबर रस्त्यांची बांधणी आणि दुरुस्तीच्या कामांचा खर्च वाढत आहे. याबाबत गडकरी म्हणाले, ‘देशात महामार्ग विकासासाठी ११० लाख टन पेट्रोलियम बिटुमिनची गरज लागते. आता देशामध्ये बायो बिटुमिन बनविण्याला परवानगी देण्यात आली आहे. तांदूळ, कापूस आदी जैविक कचऱ्यापासून बिटुमिन निर्मितीसाठी संशोधन करण्यात आले. या संशोधनामुळे देशातील पहिला बायो बिटुमिनचा १ किलोमीटर लांबीचा रस्ता नागपूर ते जबलपूर महामार्गावर तयार झाला.

---

## विदेशात प्रवास करण्यासाठी आता टॅक्स लागणार?

**नागपूर/वृत्तसंस्था**

पंतप्रधान मोदी यांनी काही दिवसांपूर्वी विदेशात प्रवास करण्याचे किंवा पर्यटन करणे टाळावे, असे आवाहन केले होते. एका वृत्त संकेतस्थळाने याबद्दल वृत्तांकन करताना सरकार विदेश प्रवासावर कर लावण्याचा विचार करत असल्याचे म्हटले होते. मात्र ही बाब खरी नसल्याचे स्वतः पंतप्रधान मोदी यांनी स्पष्ट केले आहे. शुक्रवारी रात्री पंतप्रधान मोदींनी या बातमीची पोस्ट शेअर करत त्यावर ही धादांत खोटी माहिती असल्याचे सांगितले.

पंतप्रधान मोदींनी रात्री एस्कवर केलेल्या पोस्टमध्ये म्हटले, “ही बातमी पूर्णपणे चुकीची आहे. यात तसूभरही सत्य नाही. विदेशातील प्रवासावर निर्बंध आणण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.” तसेच त्यांनी भारतीय नागरिकांसाठी व्यवसायात सुलभता आणि जीवनात सुलभता आणण्याच्या केंद्र सरकारच्या वचनबद्धतेवरही जोर दिला.

पंतप्रधान मोदींच्या स्पष्टीकरणानंतर आता सदर वृत्त संकेतस्थळाने माफी मागितली असून आपले वृत्त मागे घेतले आहे. विदेशातील प्रवासावर संभाव्य निर्बंध आणि अतिरिक्त कराबाबत अफवा पसरू नये, यासाठी पंतप्रधान मोदी यांनी स्वतः हस्तक्षेप करत हे वृत्त नाकारले. मध्यपूर्वेतील तणावामुळे अर्थव्यवस्थेवर येत असलेला तणाव आणि इंधनाच्या वाढत्या किमतीमुळे सदर बातमीमुळे उलटसुलट चर्चा सुरू झाली होती. भारत कच्च्या तेलाच्या गरजेपैकी ८५ टक्क्यांहून अधिक तेल आयात करतो.



मध्यपूर्वेतील संघर्षाच्या पार्श्वभूमीवर कच्च्या तेलाच्या पुरवठ्यात व्यत्यय आला आहे. यामुळे भारतासह जगभरात इंधन तुटवड्याचा सामना करावा लागत आहे.

पंतप्रधान मोदी सध्या पाच देशांच्या दौऱ्यावर गेले आहेत. शुक्रवारी त्यांनी संयुक्त अरब अमिरातीच्या राष्ट्राध्यक्षांशी चर्चा केली. मध्यपूर्वेतील तणाव त्यातून विस्कळीत झालेला इंधन पुरवठा यावर भारताची ऊर्जा सुरक्षा बळकट करण्यासाठी संयुक्त अरब अमिरातीबरोबर सामरिक पेट्रोलियम साठ्यांसंदर्भात सामंजस्य करार करण्यात आला. भारत सरकारमधील सूत्रांनी सांगितले की, या नव्या करारामुळे ऊर्जा सहकार्य अधिक दृढ होईल आणि भारताकडे कच्च्या तेलाचा अधिक पुरवठा होईल.

---

## ‘पाकिस्तानवर उपकार...’अमेरिकेने इराणसोबत युद्धविराम का केला? ट्रम्प यांचा खुलासा!

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था**

अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यात २८ फेब्रुवारी रोजी सुरू झालेले युद्ध ८ एप्रिल रोजी थांबले. या युद्धबंदीमागे पाकिस्तानची मध्यस्थी कारणीभूत असल्याचा खुलासा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केला आहे. ‘एअर फोर्स वन’ विमानात पत्रकारांशी बोलताना ट्रम्प म्हणाले की, इराणसोबत युद्धबंदी करण्याची त्यांची इच्छा नव्हती, परंतु पाकिस्तानचा शब्द राखण्यासाठी आणि त्यांच्यावर एकप्रकारे उपकार म्हणून अमेरिकेने हा निर्णय घेतला. ट्रम्प यांनी पाकिस्तानचे पंतप्रधान आणि फील्ड मार्शल यांचे कौतुक केले असून इराणला अण्वस्त्र तयार करू न देण्याचा इशारा दिला आहे.

इराणसोबत करण्यात आलेल्या युद्धबंदीमागे पाकिस्तानची मध्यस्थी कारणीभूत असल्याचा खुलासा ट्रम्प यांनी केला आहे. “इराणसोबत युद्धबंदी करण्याची



माझी अजिबात इच्छा नव्हती, पण पाकिस्तानचा शब्द राखण्यासाठी आणि त्यांच्यावर एकप्रकारे उपकार म्हणूनच आम्ही हा निर्णय घेतला,” असा खळबळजनक खुलासा ट्रम्प यांनी केला आहे. यासोबतच, इराणवर आता नव्याने कोणताही बॉम्बहल्ला केला जाणार नसल्याचे स्पष्ट करत ट्रम्प यांनी आखातातील तणाव काहीसा कमी करण्याचे संकेत दिले आहेत.

चीनचा दौरा आटोपून अमेरिकेकडे परतत असताना ट्रम्प यांनी ‘एअर फोर्स वन’ या राष्ट्राध्यक्षांच्या अधिकृत विमानात पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी ट्रम्प म्हणाले- “आम्ही केवळ एका दुसऱ्या देशाच्या विनंतीचा मान ठेवून ही युद्धबंदी मान्य केली आहे. खरं तर मी या निर्णयाच्या बाजूने नव्हतो, पण पाकिस्तानवर उपकार म्हणून आम्ही हे पाऊल उचलले. पाकिस्तानचे पंतप्रधान आणि फील्ड मार्शल हे दोघेही अत्यंत उत्तम व्यक्ती आहेत.” अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्यात २८ फेब्रुवारी रोजी थेट युद्धाला सुरुवात झाली होती. त्यानंतर पाकिस्तानच्या मध्यस्थीने दोन्ही बाजूंनी सहमती दर्शवल्यानंतर, ८ एप्रिलपासून हे हल्ले थांबवण्यात आले होते.

डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणच्या अणू कार्यक्रमाबाबत आपली भूमिका पुन्हा एकदा स्पष्ट केली आहे. “इराणला कोणत्याही परिस्थितीत अण्वस्त्र तयार करू दिली जाणार नाहीत. तेहरानने (इराणची राजधानी) युरेनियमचा नाद सोडला पाहिजे,” असा सज्जड दम ट्रम्प यांनी दिला. इराणने पाठवलेला शांतता प्रस्ताव आपण पहिल्याच वाक्यात फेटाळून लावल्याचेही ट्रम्प यांनी सांगितले. आपला अणू कार्यक्रम पूर्णपणे बंद करण्याबाबत इराणने या प्रस्तावात कोणतीही ठोस हमी दिली नव्हती, त्यामुळे अमेरिकेने हा प्रस्ताव नाकारला. इराणसोबत प्रदीर्घ काळ चाललेल्या या संघर्षामुळे ट्रम्प काहीसे राजकीय दबावात असतानाच चीन दौऱ्यावर गेले होते. मात्र, चीनकडून इराणच्या मुद्द्यावर कोणताही मोठा तोडगा काढण्यात त्यांना यश आले नाही. बीजिंगमधील ‘झोंगनानहाई गार्डन’ येथे चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्याशी झालेल्या चर्चेबाबत बोलताना ट्रम्प म्हणाले, “आम्ही इराणच्या समस्येवर सविस्तर चर्चा केली. या समस्येचा कसा तोडगा काढायचा, याबाबत आमच्या दोघांचे विचार बरेच सारखे आहेत. इराणकडे अण्वस्त्रे नसावीत आणि ‘स्ट्रेट ऑफ होर्मुझ’ (होर्मुझची सामुद्रधुनी – जागतिक तेल व्यापाराचा मुख्य सागरी मार्ग) वाहतुकीसाठी खुली राहावी, यावर आमचे एकमत आहे.”

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# दहा कोटींचा खर्च वाया; रिंगरोडसाठी खोदले दोन वर्षांपूर्वी बनविलेले सर्व्हिसरोड



**नाशिक/वृत्तसंस्था**


खासदार निधीतून दहा कोटी रुपये खर्चून तयार करण्यात आलेल्या सिन्नर फाटा ते गाडेकरमळा दरम्यानच्या जवळपास दीड किलोमीटर लांबीच्या साडेसात मीटर रुंदीच्या दोन सर्व्हिस रोडचा दोन वर्षांतच रिंगरोडच्या नावाखाली बळी देण्यात आल्याचा प्रकार नाशिकरोड येथे घडला आहे.विशेष म्हणजे, हे दोन्ही रस्ते पूर्णतः खणून काढण्यात आले असून, संपूर्ण रिंगरोड देखील वीस मीटर पूर्वेस सरकविण्यात आला आहे. परिणामी, संपूर्ण दहा कोटींचा खर्च वाया गेला असून, पालिका आयुक्तांच्या नजरेत हा प्रकार का आला नाही, असा सवाल स्थानिक नागरिकांनी उपस्थित केला आहे.गाडेकर मळा ते सिन्नर फाटा दरम्यान तत्कालीन खासदार हेमंत गोडसे यांच्या १० कोटी रुपयांच्या निधीतून साडेसात मीटर रुंदीचे जवळपास दीड किमी लांबीचे दोन सर्व्हिस रोड तयार करण्यात आले होते. नैसर्गिक नाल्यांवर पुलाची कामेही पूर्ण झालेली होती. विशेष म्हणजे या रस्त्यांच्या दुतर्फा लेआउट झालेले नव्हते. कोणीही वास्तव्यासदेखील नव्हते. असे असतानाही येथे दोन सर्व्हिस रोडवर १० कोटी रुपयांचा निधीही खर्च झाला होता. या रस्त्यामुळे या ठिकाणच्या जमिनींचे मूल्यही काही पटींनी वाढले होते.

आता या ठिकाणी पालिकेने बाह्य रिंगरोड प्रस्तावित केल्याने हे दोन्हीही सर्व्हिसरोड खणून काढण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. परिणामी, जनतेच्या १० कोटी रुपयांचा निधीही वाया गेला आहे. या ठिकाणी आता बाह्य रिंगरोड होणार असून, हा रिंगरोड देखील पूर्वेस सरकविण्यात आला आहे.या ठिकाणी डीपी रोड प्रस्तावित होता. त्याच्या दोन्ही बाजूंनी पालिकेनेच सर्व्हिस रोड तयार केले होते. अतिक्रमण होऊ नये या उद्देशाने अगोदर दोन्ही सर्व्हिस रोडची कामे पालिकेने स्वखर्चातून केली. खडीकरणही पालिकेने केले. मात्र, येथे रिंगरोड प्रस्तावित झाल्याने डांबरीकरण थांबविल्याची माहिती पालिकेच्या बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्याने 'मटा'ला दिली. या दाव्यामुळे या रस्त्याच्या कामातील गौडबंगाल आणखी वाढले आहे.

## पेपर मिळाल्याचा संशय! लातूरमध्ये डॉक्टरच्या घरी CBIची धाड, 3 तासांपासून चौकशी

**लातूर/वृत्तसंस्था**

नीट पेपरफुटी प्रकरणात लातूरमध्ये याआधी दोन लोकांना सीबीआयकडून ताब्यात घेण्यात आले आहे. आज सीबीआयच्या पथकाने दिवसभर प्राध्यापक शिवराज मोटेगावकर यांच्या खाजगी शिकवणीवर कागदपत्रांची तपासणी सुरू ठेवली होती. यानंतर सायंकाळी लातूर शहरातील औसा रोड परिसरातील एका बालरोगतज्ज्ञ डॉक्टरच्या घरी सीबीआयचे पथक चौकशीसाठी दाखल झाले आहे. मागील तीन तासापासून डॉक्टरची कसून चौकशी केली जात असल्याची माहिती समोर येते आहे. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार बालरोग तज्ञ डॉक्टरांची मुलगी यावर्षी नीटची परीक्षा देणार होती. आता सध्या याप्रकरणी सीबीआयकडून तपासणी केली जात आहे. नीट पेपर फुटी प्रकरणात लातूर शहरातील रसायनशास्त्राचे निवृत्त प्राध्यापक पी व्ही कुलकर्णी आणि यानंतर आरसीसी या खाजगी क्लासेसचे संचालक शिवराज मोटेगावकर यांच्यावर झालेल्या सीबीआयच्या कारवाईनंतर लातूर शहरातील काही डॉक्टरांची नावे चर्चेत आली होती. या डॉक्टरांनी आपल्या पाल्यासाठी




पेपर विकत घेतल्याच्या चर्चा कानावर येत होत्या. याच अनुषंगाने लातूर शहरातील औसा रोड परिसरात एका बालरोग तज्ञ डॉक्टरांवर सीबीआयची धाड पडली आहे. मागील तीन तासापासून सीबीआयच्या पथकाकडून चौकशी केली जात आहे. दरम्यान, सीबीआय मागील सहा दिवसांपासून लातूरमध्ये तळ ठोकून आहे.दरम्यान, काल शिवराज मोटेगावकर याला दिल्ली येथील विशेष न्यायालयात हजर केले होते. त्यानंतर त्याला कोर्टाने ९ दिवसांची सीबीआय कोठडी सुनावली आहे. सीबीआयने त्याच्यावर अनेक गंभीर आरोप केले आहेत. शिवराज मोटेगावकर याच्याविरोधात अनेक पुरावे असल्याचा दावा सीबीआयने न्यायालयापुढे केला. त्यानंतर न्यायालयाने ही कोठडी मंजूर केली आहेत. मोटेगावकरने त्याच्या मोबाईलमधील पुरावे डिलिट केल्याचा मोठा ठपका हा सीबीआयने ठेवला आहे.

## आई रागावल्याच्या संतापातून स्वतःवरच वार

**अमरावती :** दर्यापूर शहरात एका अल्पवयीन मुलीवर दोन अज्ञातांनी घरात घुसून चाकूहल्ला केल्याचे वृत्त पसरताच खळबळ उडाली. मात्र, दर्यापूर पोलिसांनी सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या फुटेजने या कथित हल्ल्याचा थरारक बनाव अवघ्या काही तासांत खोडून काढला. आई रागावल्याच्या संतापातून मुलीने स्वतःवर वार करून स्वतःला जखमी केले होते, हे तपासात उघड झाले आहे.दर्यापूरच्या आनंदनगर भागात बुधवारी दोन दुचाकीस्वारांनी एका मुलीवर जीवघेणा हल्ला केल्याची तक्रार दाखल झाली होती. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिस अधीक्षक निकेतन कदम यांच्यासह वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने तपासाची चक्रे फिरवली. आरोपींचा शोध घेण्यासाठी दोन पथके तैनात करण्यात आली.

तपासादरम्यान पोलिसांनी आनंदनगर परिसरातील मुख्य रस्त्यावरील सीसीटीव्ही फुटेज तपासले. मात्र, कथित घटनेच्या वेळेत तिथे कोणतीही संशयास्पद हालचाल किंवा मोटारसायकल दिसली नाही. हाच या तपासातील सर्वात मोठा टर्निंग पॉइंट ठरला आणि पोलिसांचा संशय बळावला.सहायक पोलिस निरीक्षक नम्रता राठोड यांनी मुलीला आणि तिच्या आईला विश्वासात घेऊन कसून चौकशी केली.

## महिलांच्या टोळीने लुटले वृद्धेचे दागिने; पिण्याच्या पाण्यातून दिले गुंगीचे औषध

**नाशिक/वृत्तसंस्था**

सामान्य रुग्णालयातून पायदुखीचे औषध घेऊन बाहेर पडणाऱ्या ६४ वर्षीय वृद्धेला दोन अनोळखी महिलांनी पाण्यातून गुंगीचे औषध देत बेशुद्ध केले आणि त्यांच्या अंगावरील तब्बल दीड लाख रुपयांचे सोन्याचे दागिने लंपास केले. याप्रकरणी सरकारवाडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नाशिकच्या चुंचाळे शिवार परिसरातील लताबाई आबाजी लभडे (वय ६४) या पायदुखीच्या त्रासावर उपचार घेण्यासाठी बुधवारी (दि. २०) दुपारी नेहमीप्रमाणे जिल्हा रुग्णालयात आल्या होत्या. औषधे घेऊन त्या मुख्य प्रवेशद्वाराबाहेर पडत असतानाच, तिथे दोन संशयित महिलांनी त्यांना गाठले. 'आम्ही बाहेरगावचे असून नाशिकमध्ये नवीन आहोत. आम्हाला येथील सोनाराचे दुकान माहीत नाही', असा बहाणा त्यांनी केला. लताबाई यांनी त्यांना रिक्षा करून सराफ बाजारात जाण्याचा सल्ला दिला. मात्र, संशयित महिलांनी भावनिक साद घालत लताबाईंचा विश्वास संपादन केला आणि त्यांना सोबत येण्यास भाग पाडले. त्यानंतर तिघीही रिक्षाने सराफ बाजारातील 'अभोणकर




ज्वेलर्स' येथे गेल्या.तिथे गेल्यावर एका महिलेने सोनाराकडे सोन्याचे मणी मोडण्याबाबत केवळ नाटक केले. 'आम्ही नंतर येतो', असे दुकानदाराला सांगून त्या महिला लताबाईंना सोबत घेऊन पुन्हा जिल्हा रुग्णालयात आल्या. पायदुखीने व्याकुळ झालेल्या लताबाईंना या धावपळीत प्रचंड तहान लागली होती. हीच संधी साधून संशयित महिलांपैकी एकीने स्वतःजवळील बाटलीतील पाणी लताबाईंना पिण्यास दिले. मात्र, या पाण्यात गुंगीचे औषध मिसळलेले होते.पाणी पिताच लताबाईंना चक्कर आली आणि त्या तिथेच बेशुद्ध पडल्या. काही वेळाने लताबाईंची गुंगी उतरली. त्यांना दोन्ही महिला गायब असल्याचे दिसले. त्यांनी स्वतःची तपासणी केली असता, गळ्यातील १० ग्रॅमची सोन्याची पोत आणि कानातील ५ ग्रॅमची सोन्याची कर्णफुले असा एकूण दीड लाखांचा मुद्देमाल चोरीला गेल्याचे त्यांच्या लक्षात आले.

## प्रेमविवाहाच्या अशा भयंकर शेवटाचा कोणीच विचार केला नव्हता, पोलिसही हादरले

**सोलापूर/वृत्तसंस्था**

बार्शी शहराजवळील बार्शी-परंडा मार्गावर सोमवारी सकाळी घडलेल्या थरारक घटनेने बार्शी हादरली आहे. ऋषिकेश पाटील याने आपल्य पत्नी धनश्री पाटील हिची भररस्त्यात चाकूने निर्घृण हत्या केली आहे. पत्नीची हत्या केल्यानंतर पती ऋषिकेश पाटील स्वतःहून बार्शी ग्रामीण पोलीस ठाण्यात हजर झाला आहे. चारित्र्याचा संशयावरून ही हत्या झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. बार्शी ग्रामीण पोलीस ठाण्यात याबाबत दिवसभर गुन्हा नोंदची प्रक्रिया सुरू होती. भर रस्त्यात, पत्नीची अशी निर्घुण हत्या केल्याने संपूर्ण सोलापूर जिल्हा हादरला आहे. भर





रस्त्यात पन्नास वार केले, त्यानंतर रस्त्यावरच गळा चिरला. ऋषिकेश पाटील याने पत्नी सोबत अनेक महिने संसार केला, मात्र गळा चिरताना थोडीही दया केली नाही. बार्शी परंडा मार्गावर या जा करणाऱ्या लोकांनी लांबून सोडविण्याचा प्रयत्न केला, डोक्यात सैतान घुसलेल्या पतीने पत्नीचा जीव जाईपर्यंत वार करत राहिला आणि गळा चिरला. दोघेही पती-पत्नी उच्च शिक्षित आहेत. दोघेही वित्त क्षेत्रात चांगल्या पदावर कार्यरत आहेत. प्राथमिक माहितीनुसार धनश्री या बँक मॅनेजर पदावर कार्यरत होत्या.पती ऋषिकेश पाटील आणि पत्नी धनश्री पाटील यांच्यात किरकोळ कारणावरून मध्ये वाद झाला होता. वाद होताना अनेकदा ऋषिकेश पाटील याने धनश्रीला मारहाण केल्याची प्राथमिक माहिती मिळाली.

परंतु मागील दोन दिवसांपासून वाद चिघळले होते. सोमवारी धनश्री पाटील या नेहमीप्रमाणे बँकेकडे निघाल्या होत्या. पण वाटेत मृत्यू पतीच्या वेशभूषेत वाट पाहत होता. बार्शी परांडा मार्गावर संतापाच्या भरात ऋषिकेशने पत्नी धनश्रीवर चाकूने सुमारे 50 वार केले. धनश्री रक्ताच्या थारोळ्यात पडली , शेवटी ऋषीकेश ने गळा चिरला.बार्शी-परंडा रोडवर ऋषिकेश ज्यावेळी धनश्रीवर वार करत होता. त्यावेळी थरारक दृश्य पाहून काही लोकांनी पळ काढला तर रस्त्यावरील काही नागरिकांनी त्याला थांबवण्याचा प्रयत्न केला. डोक्यात सैतान घुसलेल्या राक्षस पतीनं मात्र नागरिकांना धमकावत मागे हटवले. धनश्रीने जाग्यावरच जीव सोडला. दोघांनी काही महिन्यापूर्वीच प्रेमविवाह केला होता. प्रेम विवाहाचा असा दुर्दैव अंत झाल्याने बार्शी सह सोलापूर जिल्ह्यात हळहळ व्यक्त होत आहे.

# आजपासून रंगणार आयपीएल प्लेऑफचा थरार; फायनलच्या दिशेने चार संघ सज्ज

■ मुंबई, वृत्तसंस्था :

आयपीएल २०२६ च्या हंगामातील ७० लीग स्टेज सामने पूर्ण झाले आहेत. रविवारी खेळलेल्या सामन्यात राजस्थान रॉयल्सने मुंबई इंडियन्सचा ३० धावांनी पराभव करुन प्लेऑफमध्ये आपली जागा पक्की केली आहे. यामुळे पंजाब किंग्स आणि कोलकाता नाइट रायडर्स यांच्या प्लेऑफमध्ये क्वालिफाय होण्याच्या संधीवर राजस्थानने पाणी फेरले. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु, गुजरात टायटन्स, सनरायझर्स हैदराबाद आणि राजस्थान रॉयल्स हे चार संघ अधिकृतपणे आयपीएल २०२६ च्या प्लेऑफसाठी क्वालिफाय झाले आहेत. आयपीएलचा फायनल गाठण्यासाठी आता प्लेऑफमध्ये चुरशीची लढत पाहायला मिळणार आहे.

बीसीसीआयने प्लेऑफचे वेळापत्रक आधीच निश्चित केले आहे. आयपीएल प्लेऑफचे सामने २६ मे रोजी सुरू होतील आणि अंतिम सामना ३१ मे रोजी होणार आहे. हे सामने धर्मशाळा, न्यू चंदीगड आणि अहमदाबाद येथे खेळले जातील. सर्वप्रथम क्वालिफायर १, त्यानंतर एलिमिनेटर आणि क्वालिफायर २ होतील. शेवटी, उरलेले दोन संघ विजेतेपदासाठी लढतील.

आयपीएल २०२६ चा पहिला प्लेऑफ सामना रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु आणि गुजरात टायटन्स यांच्यात खेळला जाईल. हा सामना २६ मे रोजी धर्मशाळा येथे होणार आहे.

## फायनल गाठण्यासाठी चुरशीची लढतविजय





विजयी संघ थेट फायनल सामना खेळेल. तर, पराभूत संघाला अंतिम फेरीत पोहोचण्याची आणखी एक संधी मिळेल आणि तो क्वालिफायर २ चा सामना खेळेल.

आयपीएल २०२६ प्लेऑफचा दुसरा सामना एलिमिनेटर असेल. हा सामना २७ मे रोजी न्यू चंदीगड येथे सनरायझर्स हैदराबाद आणि राजस्थान रॉयल्स यांच्यात खेळला जाईल. पराभूत संघ स्पर्धेतून बाहेर होईल. तर, विजेता संघ क्वालिफायर २ मध्ये प्रवेश करेल. हा सामना नॉकआउट सामना असेल.

Indian Premier League च्या २०२६ प्लेऑफचे वेळापत्रक जाहीर झाले आहे. २६ मे (मंगळवार) रोजी क्वालिफायर १ मध्ये Royal Challengers Bengaluru आणि Gujarat Titans यांच्यात सामना होणार आहे. त्यानंतर २७ मे (बुधवार) रोजी एलिमिनेटर सामन्यात Sunrisers Hyderabad आणि Rajasthan Royals आमनेसामने येतील. २९ मे (शुक्रवार) रोजी दुसरा क्वालिफायर सामना खेळवला जाईल, तर ३१ मे (रविवार) रोजी अंतिम सामना होणार आहे.

### दुसरा क्वालिफायर सामना

आयपीएल २०२६ चा दुसरा क्वालिफायर सामना २९ मे रोजी खेळवला जाणार आहे. हा सामना न्यू चंदीगड येथे आयोजित केला जाईल. एलिमिनेटरचा विजेता आणि क्वालिफायर १ मधील पराभूत संघ एकमेकांविरुद्ध खेळतील. विजयी संघ अंतिम फेरीत प्रवेश करेल. आयपीएल २०२६ प्लेऑफचे सर्व सामने सायंकाळी ७:३० वाजता सुरू होतील.

## म्युनिक शूटिंग विश्वचषकासाठी भारतीय संघ जाहीर; एकूण ६९६ खेळाडूंचा प्रवेश



■ नवी दिल्ली/वृत्तसंस्था

नॅशनल रायफल असोसिएशन ऑफ इंडियाच्या निवड समितीने आयएसएसएफ विश्वचषक म्युनिकसाठी २२ सदस्यीय भारतीय संघाची घोषणा केली आहे. दोन वेळची ऑलिम्पिक पदक विजेती मनू भाकर आणि सहकारी ऑलिम्पियन व विश्व चॅम्पियनशिप पदक विजेती ईशा सिंग या दोघी दोन वैयक्तिक पिस्तूल स्पर्धांमध्ये सहभागी होणाऱ्या खेळाडू आहेत. मनू मिश्र सांघिक पिस्तूल स्पर्धेतही भाग घेणार आहे. विश्वचषक स्पर्धेत ८० देशांतील एकूण ६९६ खेळाडूंनी प्रवेश घेतला आहे. यामध्ये अनेक ऑलिम्पिक आणि विश्वविजेत्यांचा समावेश आहे, जे या वर्षाच्या अखेरीस होणाऱ्या प्रमुख बहु-क्रीडा स्पर्धा आणि नेमबाजी विश्वचॅम्पियनशिपच्या आधी जगातील सर्वोत्तम नेमबाजांविरुद्ध आपल्या तयारीची चाचणी घेण्यासाठी उत्सुक आहेत. हा या वर्षातील दुसरा रायफल/पिस्तूल विश्वचषक असेल.


यापूर्वी, भारताने एप्रिलमध्ये ग्रेनाडा विश्वचषक स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले होते. त्या संघात देशांतर्गत क्रमवारीत ३ ते ६ क्रमांकावर असलेले नेमबाज होते. म्युनिकमध्ये, भारताचे अव्वल क्रमांकाचे रायफल आणि पिस्तूल नेमबाज यावर्षी प्रथमच आपल्या देशाबाहेर एका मोठ्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होणार आहेत. भारतीय संघात अनुभवी आणि तरुण खेळाडूंचे उत्तम मिश्रण आहे. मात्र, त्यांना एका कठीण आव्हानाला सामोरे जावे लागेल, कारण रायफल आणि पिस्तूल नेमबाजी जगतातील दिग्गज खेळाडू त्यांच्या वार्षिक म्युनिक दौऱ्यासाठी दाखल झाले आहेत.

रायफल-पिस्तूल विश्वचषक स्पर्धा जर्मनीतील म्युनिक येथे ५६ ते ३१ मे दरम्यान आयोजित केली जाईल. क्रीडाविश्वात ही स्पर्धा पारंपरिकरित्या एक अत्यंत प्रतिष्ठित वार्षिक स्पर्धा मानली जाते. जर्मन राजधानीतील प्रतिष्ठित ऑलिम्पियाशे बेनलागे इथं मंगळवारी २५ मीटर पिस्तूल महिला प्रिसिजन स्टेज स्पर्धेला सुरुवात होईल. त्यानंतर १० मीटर एअर पिस्तूल पुरुष पात्रता फेरी आणि महिला ५० मीटर रायफल ३ पोझिशन्स एलिमिनेशन फेरी सुरु होईल, त्यानंतर १० मीटर एअर रायफल पुरुष स्पर्धेची पात्रता फेरी होईल.

## माजी रणजी क्रिकेटपटूचा सामन्यादरम्यान मृत्यू

■ बंगळूरु/वृत्तसंस्था

कर्नाटकचे माजी वेगवान गोलंदाज एसएल अक्षय यांचे रविवारी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. ते ३९ वर्षांचे होते. ते २०१४-१५ च्या हंगामात रणजी ट्रॉफी जिंकणाऱ्या कर्नाटक संघाचा भाग होते. अक्षय बेंगळुरूमध्ये कर्नाटक राज्य क्रिकेट संघाच्या थर्ड डिव्हिजन सामन्यात सफायर सीसीकडून खेळत होते. चार षटके गोलंदाजी केल्यानंतर त्यांना अस्वस्थ वाटू लागल्याची तक्रार केली आणि ते मैदानाबाहेर गेले. त्यांना तात्काळ जवळच्या रुग्णालयात नेण्यात आले, जिथे डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. प्राथमिक माहितीनुसार, त्यांचा मृत्यू हृदयविकाराच्या झटक्याने झाला.



कर्नाटक राज्य क्रिकेट संघाने निवेदन जारी करून अक्षयच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला. संघाने म्हटले की, 'अक्षयने प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये कर्नाटकचे उत्कृष्ट प्रतिनिधित्व केले. खेळ कारकीर्द संपल्यानंतरही त्याने पूर्ण समर्पण आणि उत्कटतेने क्रिकेटची सेवा सुरू ठेवली.' माजी क्रिकेटपटू डोडा गणेश यांनीही त्यांच्या निधनाबद्दल दुख व्यक्त केले. त्यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर लिहिले, 'क्रिकेट जगतासाठी ही दुखद बातमी आहे. माझ्या दुखाला व्यक्त करण्यासाठी माझ्याकडे शब्द नाहीत.' डोडा गणेश यांनी पुढे लिहिले की, शांत स्वभावाच्या अक्षयने २०११-१२ मध्ये कर्नाटकसाठी खेळताना चांगले यश मिळवले होते.

क्रिकेटमधून निवृत्त झाल्यानंतर अक्षय कोचिंगमध्ये सामील झाले होते. ते कर्नाटकच्या अंडर-१९ संघासोबत काम करत होते. त्यांनी २०११ ते २०१३ दरम्यान कर्नाटकसाठी ६ फर्स्ट क्लास, तीन लिस्ट-ए आणि नऊ टी-२० सामने खेळले होते. वेगवान गोलंदाज म्हणून त्यांनी देशांतर्गत क्रिकेटमध्ये ओळख निर्माण केली होती.

## लिओनेल मेस्सीला युनियनविरुद्‌धच्या सामन्यादरम्यान दुखापत..

■ फ्लोरिडा/वृत्तसंस्था

फिफा विश्वचषक २०२६ सुरु होण्यापूर्वी दोन आठवड्यांपेक्षा कमी कालावधी शिल्लक असताना, अर्जेंटिनाचा सुपरस्टार लिओनेल मेस्सीच्या दुखापतीने संपूर्ण जगाचे लक्ष वेधून घेतले आहे. इंटर मियामीचा कर्णधार मेस्सी शनिवारी रात्री फिलाडेल्फिया युनियनविरुद्धच्या सामन्यादरम्यान अचानक मैदान सोडून गेला, ज्यामुळे अर्जेंटिनाच्या चाहत्यांची चिंता वाढली आहे.

इंटर मियामीने फिलाडेल्फिया युनियनविरुद्ध ६-४ असा रोमांचक विजय मिळवला, परंतु मेस्सीचे मैदान सोडून जाणे हा सामन्यातील सर्वात चर्चेचा विषय ठरला. ७३ व्या मिनिटाला, मेस्सीने बेंचकडे इशारा केला आणि त्याला तात्काळ मैदानाबाहेर बोलावण्यात आले. त्यानंतर तो मैदान सोडून जाताना दिसला आणि त्याची जागा मॅटेओ सिल्वेटीने घेतली. मेस्सी थेट ड्रेसिंग रुममध्ये गेला, ज्यामुळे त्याला स्नायूची दुखापत झाल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. ३८ वर्षीय मेस्सी अर्जेंटिना संघातील एक महत्त्वाचा खेळाडू आहे.

सामन्यानंतर, इंटर मियामीचे प्रशिक्षक गुइलेर्मो होयोस यांनी परिस्थितीचे गांभीर्य कमी लेखले. ते म्हणाले, माझ्या माहितीनुसार, अद्याप कोणताही वैद्यकीय अहवाल आलेला नाही, पण तो खूप थकला होता. तो केवळ थकवा होता.



# सपना चौधरी ने घेतला नवऱ्याच्या नावाचा टॅटू काढून टाकण्याचा निर्णय, भलतेच आहे कारण

हरियाणाची सुप्रसिद्ध डान्सर आणि अभिनेत्री सपना चौधरी हिनेसहा वर्षांपूर्वी वीर साहू सोबत लग्न केले. या जोडप्याला पोरस आणि शाहबीर ही दोन मुलं देखील आहेत. मात्र, सपनाने नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीनंतर, त्यांच्या नात्यात कटूता आली असून आणि मतभेदांमुळे दुरावा आल्याच्या चर्चा सोशल मीडियावर केल्या जात आहेत. या जोडप्यामध्ये अजूनही सर्व काही आलबेल आहे, की परिस्थिती घटस्फोटापर्यंत पोहोचली आहे, याबद्दल लोक वेगवेगळे अंदाज लावताना दिसतायत.अभिनेत्री सपना चौधरी हिने तिच्या हातावर वीर या पतीच्या नावाचा टॅटू गोंदवून घेतला होता.

वीर आणि सपनाचे लव्ह मॅरेज झाले होते.एका मुलाखतीदरम्यान, सपनाला तिच्या प्रेमविवाहाबद्दल आणि तिच्या हातावर गोंदवलेल्या, तिचा पती 'वीर' याच्या नावाच्या टॅटूबद्दल विचारण्यात आले, तेव्हा तिने तो टॅटू काढून टाकण्याचा आपला विचार असल्याचे सांगितले. बरेचदा कोणी एखाद्याच्या नावाचा टॅटू काढला तर हे साधारणपणे प्रेमाचे प्रतीक मानले जाते, सपनाच्या या निर्णयामुळे तिचे चाहते आश्चर्यचकित झाले. मात्र लोकांनी





याबाबत तर्कवितर्क काढण्यापूर्वीच सपनाने स्वतः या संपूर्ण प्रकरणाबाबत स्पष्टीकरण दिले.सपनाने स्पष्ट केले की, तिला तिच्या शरीरावर असलेला टॅटू हा तिच्या पेशामुळे म्हणजेच अभिनयासाठी काढून टाकायचा आहे. आमच्यात कोणताही कौटुंबिक वाद नाही. ती म्हणाली, "एका चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान, केवळ टॅटू लपवण्यासाठी मला माझ्या चेहऱ्यापेक्षा हातावरच जास्त मेकअप करावा लागत असे, ज्यामुळे माझा खूप वेळ वाया जात होता." सपनाच्या मते तिला भविष्यात अभिनयाच्या क्षेत्रात अधिक संधी मिळवायची आहे; चित्रपटांमध्ये विविध प्रकारच्या भूमिका साकारणे ही एक अनिवार्य गरज असल्याने, हा टॅटू तिच्या कामात अडथळा ठरत होता.भविष्यात टॅटू काढून टाकल्याचे पाहिल्यानंतर लोक तिच्या वैवाहिक संबंधांबद्दल वेगवेगळे तर्क लावून कोणत्याही निराधार अफवा पसरवू नयेत यासाठी सपनाने हे स्पष्टीकरण आधीच दिले होते. जेव्हा एका मुलाखतीत चर्चेचा रोख तिच्या वैवाहिक संबंधांचे स्वरूप आणि त्यातील संभाव्य मतभेदांकडे वळला, तेव्हा सपनाने अत्यंत मनमोकळेपणाने त्याला प्रतिसाद दिला. पण लोकांना तिचे हे वागणे आवडले नाही.

तिचे लग्न हे केवळ एक 'दिखावा' आहे का असा सवाल अनेकजण करत आहे.वीर साहू हा हरियाणातील एक प्रसिद्ध गायक, लेखक, संगीतकार आणि अभिनेता आहेत. त्याने 'थड्डी बड्डी' आणि 'खलनायक' यांसारखी गाणी गायली आहेत. दुसरीकडे, सपना ही हरियाणा आणि पंजाबमधील लोकप्रिय डान्सर आणि अभिनेत्री आहे. 'बिग बॉस 11' मुळे तिला देशभरात ओळख मिळाली. ती 'मॅडम सपना' या आगामी सिनेमात दिसणार आहे.

## ममता कुलकर्णी, दिव्या भारतीमध्ये खूप ॲटिट्यूड, मिथु,संजय दत्त , माधुरीबद्दलही मोठा खुलासा

बॉलिवूडमधील ९० च्या दशकातील कलाकारांची गेल्या काही वर्षांत वेगवेगळ्या कारणामुळं चर्चा झाली. त्या काळात बॉलिवूडमधले कलाकार सेटवर कसे वागायचे, याबद्दल अनेक कलाकारांनी भाष्य केलंय. आता बॅकग्राउंड डान्सर रुबिना खान हिनं देखील काही जुने किस्से सांगितले आहेत.प्रसिद्ध बॅकग्राउंड डान्सर रुबिना खान हिनं नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत चित्रपटांच्या सेटवरील कलाकारांच्या वागणुकीबद्दल अनेक धक्कादायक केले आहेत. इंडस्ट्रीतील काही बड्या अभिनेत्री सुरुवातीच्या काळात कशा गर्विष्ठ होत्या, तर दुसरीकडं सुपरस्टार अभिनेते डान्सर्सशी कसे मैत्रीपूर्ण वागायचे, यावर तिनं स्पष्टपणे भाष्य केलं आहे.नुकत्याच दिलेल्या मुलाखतीत रुबिनानं ९० च्या दशकातील आघाडीच्या अभिनेत्री ममता कुलकर्णी आणि दिवंगत अभिनेत्री दिव्या भारती यांच्याबद्दल एक आठवण शेअर केली. ती म्हणाली, असं नाहीये की त्या वाईट वागायच्या किंवा वाईट होत्या, पण त्यांच्या करिअरच्या सुरुवातीचे जे दिवस होते, त्या काळात त्यांच्यात ॲटिट्यूड होता.डान्स करत असताना बॅकग्राउंड डान्सरचा धक्काही लागलेला त्यांना चालायचा नाही, बॅकग्राउंड डान्सरचा धक्का लागू नये म्हणून त्या आम्हाला दूर राहण्यासाठी सांगायच्या. तर काही बॅकग्राउंड डान्सरही त्यांच्यावरचढ होते, अभिनेत्रींना मुद्दाम त्रास देण्यासाठी डान्सस्टेप चुकवायचे, असा खुलासाही रुबिनानं केलाय. तर संजय दत्त आणि मिथुन चक्रवर्ती हे मात्र सगळ्यांसोबत सारखंच वागायचे, असंही रुबिनानं सांगितलं. संजय दत्त, मिथुन चक्रवर्ती, जॅकी



श्रॉफ आणि अजय देवगन यांसारखे स्टार्स कधीही सेटवर स्टारसारखे वागले नाहीत. त्यांनी आम्हाला नेहमी मित्रासारखी वागणूक दिली. ते आमच्याशी सहज गप्पा मारायचे आणि जोक मारायचे, असंही रुबिना म्हणाली.रुबिनानं बॉलिवूडची 'धक धक गर्ल' माधुरी दीक्षितचंही विशेष कौतुक केलं. ती म्हणाली की, माधुरी इतकी मोठी सुपरस्टार असूनही तिचे पाय जमिनीवर होते. एका गाण्याच्या शूटिंगदरम्यान माधुरी चक्क डान्सर्ससोबत जमिनीवर खाली बसली होती. ती सर्वांशी गप्पा मारत होती आणि जोक्स सांगत होती. ती सुपरस्टार आहे आणि आम्ही फक्त डान्सर्स आहोत, असं तिनं कधीही भासू दिलं नाही.

## मला दिसण्याबाबत न्यूनगंड होता, पण अशोक सराफ यांच्या येण्यानं सर्व बदललं

अभिनेत्री निवेदिता सराफ यांनी आजवर अनेक गाजलेल्या सिनेमांमध्ये काम केलं आहे. निवेदिता सराफ यांनी घर आणि करिअर अत्यंत उत्तमरित्या सांभाळलं आहे. या संपूर्ण प्रवासात निवेदिता यांना त्यांचे पती अशोक सराफ यांचं पाठबळ मिळालं. अशातच आता नुकत्याच एका मुलाखतीमध्ये निवेदिता सराफ यांनी अशोक सराफ यांच्या येण्यानं त्यांचं आयुष्य कसं बदललं याबद्दल सांगितलं आहे.एका मुलाखतीमध्ये निवेदिता सराफ म्हणाल्या की, 'मला सुरुवातीला माझ्या दिसण्याबाबत खूप न्यूनगंड होता. कारण, माझे वडील गजन जोशी फार हँडसम होते. वयाच्या ४२ व्या वर्षी त्यांचं निधन झालं, ते फार लवकर आम्हाला सोडून गेले. ते फारच छान दिसायचे आणि माझी मोठी बहीण सुद्धा दिसायला खूप छान आहे. त्यात ती शाळेत प्रचंड हुशार होती. माझ्या सगळ्याच बहिणी गोऱ्या दिसायच्या, माझी आई गोरी होती . त्यामुळे मला नेहमी असं वाटायचं अरे मी छान दिसत नाही. म्हणून मला दिसण्याबाबत न्यूनगंड होता.'माझी उंची कमी आहे, मी खूप बारीक



आहे, असं मला नेहमी वाटायचं. मी अजिबात छान दिसत नाही. पण, पुढे मला आयुष्यात अशोक सराफ भेटले आणि सगळं बदलून गेलं. कारण, त्यांनी मला एका महत्त्वाच्या गोष्टीची जाणीव करून दिली. तुम्ही जर छान काम केलंत, तर तुम्ही आपसूकच सुंदर वाटता किंवा सुंदर दिसता. दिसण्यापेक्षा तुमचा आत्मविश्वास महत्त्वाचा आहे. एखादा सीन छान केला तर तू सुंदरच वाटशील. त्यामुळे आपण स्वत:ला कसं दाखवताय याकडे आपलं लक्ष असलं पाहिजे. जर, तुम्हाला स्वत:ला वाटलं की, मी सुंदर आहे, तर, आजूबाजूच्या बघणाऱ्यांना सुद्धा वाटतं की, ही सुंदर आहे.

***

## प्रत्येक मुलीला हक्काचं घर मिळायला हवं, जिथे ती कोणतीही भीती, लाज किंवा परवानगी न घेता परत येऊ शकेल'

नोएडा येथील ३३ वर्षीय ट्विशा शर्माचा लग्नाच्या अवघ्या पाच महिन्यांत संशयास्पद मृत्यू झाला. भोपाळमधील वकील समर्थ सिंहसोबत ट्विशाचं डिसेंबर २०२५ मध्ये लग्न झालेलं. ट्विशाचा सासरी छळ झाल्याचा आरोप तिच्या घरच्यांनी केला आहे. याप्रकरणाचा तपास सध्या सुरू असून काही कलाकारांनी यावर प्रतिक्रिया दिल्या आहेत. अशातच आता मराठी अभिनेत्री अपूर्वा नेमळेकरनंही यासंदर्भात पोस्ट शेअर केली आहे.अपूर्वा नेमळेकरनं इन्स्टाग्रामवर पोस्ट शेअर करत लिहिलं की, 'प्रत्येक मुलीला असं हक्काचं घर मिळायलाच हवं, जिथे ती कोणतीही भीती, लाज किंवा परवानगी न घेता परत येऊ शकेल. समाज मुलींना तडजोड करायला तर शिकवतो, पण वेळप्रसंगी तिथून बाहेर कसं पडायचं हे क्वचितच शिकवतो. कधीकधी वाळलेल्या झाला पाणी देणं थांबवून नव्याने सुरुवात करणं, हेच सगळ्यात धाडसाचं पाऊल असतं.'ही पोस्ट शेअर करत अभिनेत्रीनं कॅप्शनमध्ये लिहिलंय की, 'काही मुली लग्नानंतर कोणत्याही ऐशोआरामाची अपेक्षा करत नाहीत... त्या फक्त अशा घरासाठी प्रार्थना करतात जिथे त्यांना आदर मिळेल, त्यांच्या भावना समजून घेतल्या जातील आणि त्या भावनिकदृष्ट्या सुरक्षित असतील आणि कदाचित, आता याबद्दल अधिक जागरूकता निर्माण करण्याची वेळ आली आहे. मुलींना हे शिकवा की तडजोड कधीही स्वतःची मनःशांती, स्वाभिमान किंवा स्वतःचा जीव पणाला लावून नसावी. त्यांना हे शिकवा की घरी परत येणं म्हणजे अपयश नाही. उलट, सगळं मुकाट्याने सहन करणं आणि त्यातच स्वतःला गमावणं हे खरं अपयश आहे.'स्वतःच्या अनुभवाबद्दल अपूर्वा म्हणते की, 'मी नशीबवान होते की माझ्या कठीण काळात माझे आई-वडील,माझा भाऊ आणि बहीण माझ्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले. आज मला त्यांची खूप आठवण येतेय, पण त्यांच्या या पाठिंब्याने मला एक गोष्ट शिकवली - एक सुरक्षित जागा एखाद्याचा जीव वाचवू शकते.'समाज नेहमीच काही ना काही बोलत राहील. जे लोक आज तुमच्या निर्णयांवरून तुम्हाला जज करत आहेत, तेच लोक जेव्हा तुम्ही आतून तुटत असता तेव्हा मौन बाळगून असतात. म्हणूनच प्रत्येक स्त्रीला हे ठाऊक असायला हवं. स्वतःची निवड करणं हा कधीही स्वार्थीपणा नसतो. कधीकधी वाळलेल्या झाडाला पाणी देणं थांबवून नव्याने सुरुवात करणं, हेच सगळ्यात धाडसाचं पाऊल असतं. जर या पोस्टमुळे शांतपणे सगळं सहन करणाऱ्या एका जरी स्त्रीला स्वतःची निवड करण्याची, स्वतःला सावरण्याची किंवा कोणाकडे मदत मागण्याची प्रेरणा मिळाली... तर या पोस्टचा उद्देश यशस्वी झाला.' असं अपूर्वानं शेवटी लिहिलं आहे.



***

# शांतता समितीची बैठक;बकरी ईद शांततेत व मार्गदर्शक सूचनांचे पालन करून साजरी करा...

**जनसंचलन बुलढाणा**

बकरी ईद (ईद-अल-अजहा) हा सण त्याग, बलिदान, सौहार्द आणि शांततेचा संदेश देणारा सण आहे. हा सण सर्वांनी शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करून अत्यंत आनंदाने, उत्साहाने आणि शांततेत साजरा करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. प्रवीणकुमार देवरे यांनी केले. बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कार्यालयातील जिजाऊ सभागृहात जिल्हास्तरीय शांतता समितीची महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी, तहसीलदार आणि पोलीस निरीक्षक अशा ७० हून अधिक ठिकाणावरून अधिकारी व शांतता समितीचे सदस्य दृक्श्राव्य (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग) माध्यमातून जोडले गेले होते. जिल्हाधिकारी डॉ. देवरे पुढे म्हणाले की, जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये यापूर्वीच शांतता समितीच्या बैठका पार पडल्या असून, सर्व सदस्यांनी सण शांततेत साजरा करण्याचे आश्वासन दिले आहे. प्रशासनाची तयारी पूर्ण असून पोलीस बंदोबस्त चोख ठेवण्यात आला आहे. तसेच तात्पुरत्या कत्तलखान्यांचीही व्यवस्था करण्यात आली आहे. सर्वांनी आपल्या परिवारासह हा सण आनंदाने आणि उत्साहाने साजरा करावा. जिल्हा पोलीस अधीक्षक तांबे यांनी सांगितले की, ईदच्या निमित्ताने कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जिल्हा पोलीस प्रशासन, महसूल प्रशासन, नगरपालिका आणि पशुसंवर्धन विभाग पूर्णपणे सज्ज आहे. प्रतिबंधित जनावरांची अवैध तस्करी रोखण्यासाठी जिल्ह्यातील सर्व सीमांवर आणि संवेदनशील ठिकाणी २४ तास कार्यरत राहणारे विशेष चेक नाके (तपासणी नाके) उभारण्यात आले आहेत. संबंधित विभागांचे अधिकारी व कर्मचारी या नाक्यांवर अहोरात्र लक्ष ठेवून असतील. कोणत्याही प्रकारची बेकायदेशीर हालचाल किंवा सामाजिक शांतता भंग होण्याबाबत काहीही संशयास्पद माहिती मिळाल्यास नागरिकांनी तात्काळ पोलीस प्रशासनाशी संपर्क साधावा, असे आवाहनही पोलीस अधीक्षक तांबे यांनी केले. बैठकीदरम्यान उपस्थित असलेल्या शांतता समितीच्या विविध समाजातील प्रतिष्ठित सदस्यांनी प्रशासनाला पूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. सदस्यांनी एकमुखाने सांगितले की, बुलढाणा जिल्हा हा नेहमीच सामाजिक सलोखा आणि शांतताप्रिय नागरिकांचा जिल्हा म्हणून ओळखला जातो, हीच गौरवशाली परंपरा यापुढेही कायम ठेवली जाईल. बकरी ईदचा सण साजरा करताना शासनाने जारी केलेल्या सर्व मार्गदर्शक सूचनांचे व नियमांचे तंतोतंत पालन केले जाईल. जिल्ह्यात कुठेही, कोणत्याही प्रकारची अप्रिय घटना घडणार नाही आणि सलोख्याचे वातावरण अबाधित राहील, अशी ग्वाही यावेळी समितीच्या सदस्यांनी जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षकांना दिली. याच बैठकीत जिल्हाधिकाऱ्यांनी उपस्थित सदस्यांना आणि नागरिकांना राष्ट्रीय महत्त्वाच्या योजनांमध्ये सहकार्य करण्याचे आवाहन केले. सणाच्या निमित्ताने मतदार यादी () विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत बीएलओ () आपल्या घरी येईल, त्यांना अचूक माहिती देऊन सहकार्य करावे, आगामी जनगणनेसाठी



येणाऱ्या शासकीय अधिकाऱ्यांना योग्य माहिती देऊन सहकार्य करावे, तसेच राज्यातील सर्व नागरिकांना मोफत उपचारासाठी आयुष्मान कार्ड उपलब्ध करून दिले जात असून या योजनेची माहिती आणि प्रबोधन करावे, असे आवाहन त्यांनी केले. या बैठकीला जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे, निवासी उपजिल्हाधिकारी सुरेश कव्हडे, उपजिल्हाधिकारी समाधान गायकवाड हे प्रत्यक्ष उपस्थित होते. तसेच व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे सर्व उपविभागीय अधिकारी (), तहसीलदार, उपविभागीय पोलीस अधिकारी, पोलीस निरीक्षक आणि शांतता समितीचे प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. बैठकीच्या शेवटी जिल्हाधिकारी आणि जिल्हा पोलीस अधीक्षक यांनी सर्व मुस्लिम बांधवांना आणि जिल्हावासीयांना ईद-अल-अजहाच्या (बकरी ईद) मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

---


# जिल्ह्यातील पाणीटंचाईग्रस्त ५१ गावांसाठी ५८ विंधण विहिरी व १० कुपनलिकांना प्रशासकीय मंजुरी

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्ह्यातील पाणीटंचाई निवारणासाठी जिल्हाधिकारी डॉ. प्रविणकुमार देवरे यांनी सन २०२५-२६ करिता खामगाव, शेगाव आणि मलकापूर तालुक्यातील ५१ गावांमध्ये ५८ विंधण विहिरी व १० कुपनलिका मंजूर केल्या आहेत. संबंधित प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सादर केले होते. तहसीलदार, गट विकास अधिकारी तसेच भूवैज्ञानिकांनी गावांमध्ये तीव्र पाणीटंचाई असल्याची शिफारस केल्यानंतर ही प्रशासकीय मंजुरी देण्यात आली आहे. शासनाच्या ३ फेब्रुवारी १९९९ च्या निर्णयान्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून ही मंजुरी देण्यात आली असून, मंजूर कामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश ग्रामीण पाणी पुरवठा विभागाला देण्यात आले आहेत. मंजूर गावांमध्ये खामगाव तालुक्यातील लाखणवाडा बु., खामगाव ग्रामपंचायत, जळका भडंग, नायदेवी, हिवरखेड, चिचपूर आदी गावांचा समावेश आहे. शेगाव तालुक्यातील सवर्णा, माटरगाव बु., घुई, जाणोरी, भोनगाव, खातखेड तसेच मलकापूर तालुक्यातील दाताळा, देवधाबा, बलाड, वाघूड, भडाग्रा, धरणगाव, रनथम आदी गावांमध्येही उपाययोजना राबविण्यात येणार आहेत. या आदेशानुसार मंजूर कामे शासनाच्या सर्व नियम व मार्गदर्शक सूचनांचे पालन करून पूर्ण करण्याची जबाबदारी कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद बुलढाणा यांच्यावर सोपविण्यात आली आहे. कामे सुरू करण्यापूर्वी कमी खर्चाच्या पर्यायी उपाययोजना शक्य नसल्याची खात्री करणे बंधनकारक राहणार आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे की, नव्या विंधण विहिरी अथवा कुपनलिका सुरू करण्यापूर्वी नादुरुस्त हातपंप दुरुस्त करण्यास प्राधान्य द्यावे. तसेच कामांचे जिओ-टॅगिंग करून छायाचित्रांसह नोंद ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. संबंधित कामे ३० जून २०२६ पूर्वी पूर्ण न झाल्यास मंजुरी आपोआप व्यपगत होणार असल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे. विंधण विहिरी पूर्ण झाल्यानंतर संबंधित गावांमध्ये पुरेसे पाणी उपलब्ध झाल्यास टँकरद्वारे अथवा खाजगी विहीर अधिग्रहणाद्वारे सुरू असलेला पाणीपुरवठा बंद करण्याची दक्षता घेण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. अपूर्ण राहिलेल्या कामांचे देयक पाणीटंचाई निधीतून अदा करण्यात येणार नसल्याचा इशाराही आदेशात देण्यात आला आहे. दरम्यान, संबंधित उपविभागीय अधिकारी व तहसीलदारांना महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन) अधिनियम २००९ अंतर्गत आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले असून, कामांच्या प्रगतीचा साप्ताहिक अहवाल प्रत्येक गुरुवारी सादर करण्याच्या सूचना प्रशासनाने दिल्या आहेत.

# २६ मेपासून अकोला येथे जी.डी.सी.अँड ए व सी.एच.एम. परीक्षा

**जनसंचलन/बुलढाणा**




महाराष्ट्र शासनाच्या सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागामार्फत आयोजित करण्यात आलेल्या गव्हर्नमेंट डिप्लोमा इन को-ऑपरेशन अँड अकाऊंटन्सी (जी.डी.सी. अँड ए.) तसेच सहकारी गृहनिर्माण व्यवस्थापन प्रमाणपत्र (सी.एच.एम.) परीक्षा मे-२०२६ संदर्भातील अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली आहे. I परीक्षेसाठी अकोला, वाशिम व बुलढाणा जिल्ह्यातील एकूण १९१ परीक्षार्थी सहभागी होणार आहेत. सदर परीक्षा दि. २६, २७ व २८ मे २०२६ रोजी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अकोला यांच्या मार्फत घेण्यात येणार आहे. जी.डी.सी. अँड ए. व सी.एच.एम. परीक्षा २०२६ साठी अकोला-२३ या परीक्षा केंद्राचा पत्ता खंडेलवाल ज्ञानमंदिर स्कूल, श्री इंदिरादेवी मोहनलाल खंडेलवाल मेमोरियल हायस्कूल, विजय मिडलक्लास हाऊसिंग सोसायटी, गोरक्षण रोड, अकोला असा आहे. परीक्षेची वेळ सकाळी १० ते दुपारी १ वाजेपर्यंत तसेच दुपारी २ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत राहणार आहे. ज्या परीक्षार्थ्यांना तांत्रिक अडचणीमुळे प्रवेशपत्र डाउनलोड करता आलेले नाही, त्यांनी परीक्षेच्या निर्धारित वेळेपूर्वी किमान एक तास अगोदर परीक्षा केंद्रावर उपस्थित राहावे. मुख्यालयाकडून प्राप्त उपस्थिती पत्रक व परीक्षार्थ्यांच्या छायाचित्र असलेल्या ओळखपत्राच्या पडताळणीनंतर त्यांना परीक्षा केंद्रात प्रवेश देण्यात येणार असल्याचे प्रशासनाने कळविले आहे. तरी सर्व परीक्षार्थ्यांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन जिल्हा उपनिबंधक जी.पी. साबळे यांनी केले आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




# चिखलीतील ५.२५ कोटींच्या जमीन व्यवहाराला मोठा ट्विस्ट

## दैनिक जनसंचलन बातमीचा इम्पॅक्ट, मुद्रांक विभागाची थेट नोटीस!

**जनसंचलन/ चिखली**

तालुक्यात गाजत असलेल्या ५ कोटी २५ लाखांच्या कथित जमीन व्यवहार प्रकरणात आता मोठी प्रशासकीय हालचाल सुरू झाली आहे. ङ्गहॅलो बुलढाणाफ्ने या प्रकरणाचा पर्दाफाश करताच मुद्रांक विभागाने थेट संबंधितांना नोटीस बजावत सुनावणीसाठी हजर राहण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे जिल्हाभरात एकच खळबळ उडाली आहे. केळवद येथील तब्बल ६ हेक्टर ९२ आर जमिनीच्या व्यवहारात मोठा ङ्गगेमम झाल्याचा आरोप तक्रारदार सुधाकर खरात यांनी केला होता. त्यांच्या तक्रारीनुसार, १६ मे २०२४ रोजी ५.२५ कोटी रुपयांचा नोटरी करार करण्यात आला होता. त्यावेळी तब्बल १ कोटी ७५ लाख रुपये ॲडव्हान्स दिल्याचाही दावा करण्यात आला. मात्र पुढे २२ डिसेंबर २०२५ रोजी नोंदवलेल्या खरेदीखतात फक्त १ कोटी रुपयांचाच व्यवहार दाखवण्यात आल्याचा गंभीर आरोप आहे. या कथित व्यवहारामुळे शासनाचे तब्बल २१ लाख २० हजार रुपयांचे मुद्रांक शुल्क बुडवण्यात आल्याचा दावा तक्रारीत




करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, ङ्गहॅलो बुलढाणाफ्ने हे प्रकरण जोरदारपणे उचलून धरल्यानंतर सह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालयाने संबंधितांना २ जून २०२६ रोजी सुनावणीसाठी समक्ष हजर राहण्याचे आदेश दिले आहेत. तसेच मूळ दस्तऐवज सादर करण्यासही सांगण्यात आले आहे. या प्रकरणात आता प्रशासन कोणावर कारवाई करणार? शासन महसुलाला खरोखरच फटका बसला का? आणि या व्यवहारामागे नेमकं कोणाचं संरक्षण आहे? याबाबत जिल्हाभरात जोरदार चर्चा रंगली असून, पुढील सुनावणीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# गोवंश संरक्षणासाठी मार्गदर्शक सूचना जाहिर

**जनसंचलन/बुलढाणा**

राज्यात गोवंशाची अवैध वाहतूक, अवैध कत्तल तसेच अनधिकृत कत्तलखान्यांना प्रतिबंध घालण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाने मार्गदर्शक सूचना जारी केले आहे. सदर मार्गदर्शक सूचनाचे प्रभावी अंमलबजावणी संबंधित विभागाने करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. प्रविणकुमार देवरे यांनी केले आहे. =परिपत्रकानुसार महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम, १९७६ तसेच प्राण्यांना निर्दयपणे वागविण्यास प्रतिबंध अधिनियम, १९६० यांची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. महानगरपालिका, नगरपरिषदा, ग्रामपंचायती व जिल्हा परिषदांनी आपल्या हद्दीतील अनधिकृत कत्तलखाने शोधून त्यांच्यावर तातडीने कारवाई करावी, असे स्पष्ट करण्यात आले आहे. संघटित पद्धतीने वारंवार गोतस्करी करणाऱ्या टोळ्यांविरुद्ध महाराष्ट्र संघटित गुन्हे नियंत्रण अधिनियम (मकोका) अंतर्गत कारवाई करण्याचे निर्देश पोलीस विभागाला देण्यात आले आहेत. तसेच परिवहन विभागाने गोवंश वाहतूक करणाऱ्या वाहनांची नियमित तपासणी करून मोटार वाहन अधिनियमांतर्गत नियमभंग करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, असेही नमूद करण्यात आले आहे. राज्यातील सर्व पोलीस अधीक्षक कार्यालये, पोलीस आयुक्तालये,



पशुसंवर्धन आयुक्तालय व परिवहन आयुक्तालय यांनी स्वतंत्र नोडल अधिकारी नियुक्त करून त्यांचे संपर्क क्रमांक नागरिकांसाठी उपलब्ध करून देण्याचे निर्देश शासनाने दिले आहेत. सीमावर्ती जिल्ह्यांमध्ये संयुक्त तपासणी चौक्या स्थापन करून इतर राज्यांतून महाराष्ट्रात येणाऱ्या वाहनांची तपासणी केली जाणार आहे. यासाठी पोलीस, परिवहन, स्थानिक स्वराज्य संस्था व पशुसंवर्धन विभाग यांचे संयुक्त पथक कार्यरत राहणार आहे. तसेच राज्यभर संयुक्त भरारी पथके स्थापन करून अवैध गोवंश वाहतूक व बेकायदेशीर कत्तलखान्यांवर कारवाई करण्यात येणार आहे. डायल ११२ हेल्पलाईनवर प्राप्त होणाऱ्या तक्रारींवर तात्काळ कार्यवाही करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. मुंबई महानगरपालिका क्षेत्रात धार्मिक कारणास्तव तात्पुरते पशुवधगृह उभारण्यास परवानगी दिल्यास स्वच्छता, जैववैद्यकीय कचरा व्यवस्थापन आणि सार्वजनिक आरोग्य नियमांचे पालन करणे संबंधित परवानाधारकांसाठी बंधनकारक राहणार आहे. या सूचनांची अंमलबजावणी पोलीस आयुक्तालय क्षेत्राबाहेर संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडे, तर पोलीस आयुक्तालय क्षेत्रात संबंधित पोलीस आयुक्तांकडे राहणार असून त्यांनी नियमित आढावा घेण्याचे निर्देश शासनाने दिले आहेत.

# जागतिक फुटबॉल दिनाचे आयोजन



**जनसंचलन/बुलढाणा**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य , पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय ,बुलढाणा व ब्राईट क्रीडा व बहुउद्देशीय संस्था ,बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक फुटबॉल दिनाचे आयोजन संपन्न .

बुलढाणा जिल्हा मध्ये फुटबॉल या खेळाचा प्रचार व प्रसार व्हावा, लहान वयोगटातील खेळाडूंना एक प्लॅटफॉर्म व सुप्त गुणांना वाव मिळावा, त्यांच्या मध्ये खेळाची आवड निर्माण व्हावी म्हणून दिनांक २१ ते २५ मे ,२०२६ दरम्यान जिल्हा क्रीडा फुटबॉल प्रशिक्षण केंद्र ,जिजामाता क्रीडा संकुल ,बुलढाणा येथे वयोगट १३ वर्ष खालील मुलांच्या फुटबॉल साखळी सामन्याचे आयोजन करण्यात आले होते.

जिल्हा क्रीडा फुटबॉल प्रशिक्षण केंद्राच्या ४५ तर शारदा ज्ञानपीठ शाळेच्या २५ खेळाडूंनी सहभाग नोंदविला तर जिल्हातील एकूण ७० खेळाडूंनी ६ संघा मध्ये सहभाग घेतला होता. २० मे २०२५ रोजी जिल्हा क्रीडा अधिकारी ,बुलढाणा श्रीमती भक्ती आंब्रे , तालुका क्रीडा अधिकारी श्री .बी. एस. महानकर व श्री. प्रशांत मंडले यांच्या शुभहस्ते स्पर्धाच्या टिशर्ट , ट्रॉफी व जागतिक फुटबॉल दिन लोगोच्या फ्रेम चे अनावरण करण्यात आले . स्पर्धे मध्ये सहभाग घेणाऱ्या सहा संघाना व प्रशिक्षकांना टिशर्ट चे वाटप करण्यात आले . प्रमुख अथितीनि स्पर्धा मध्ये सहभाग घेणाऱ्या संघाना शुभेच्छा दिल्या व २१ मे २०२६ पासून स्पर्धेला सुरवात झाली . २४ मे पर्यंत साखळी सामन्याचे आयोजन करण्यात आले व २५ मे रोजी सकाळी तृतीय क्रमांकाचा व सायंकाळी प्रथम क्रमांकाच्या सामन्याचे आयोजन करण्यात आले. स्पर्धे मध्ये एकूण १६ सामन्याचे आयोजन पाच दिवसामध्ये करण्यात आले . या स्पर्धे मध्ये खेळाडूंनी आपले कौशल्य पणाला लावत बुलढाणा जिल्हात फुटबॉल मय वातावरण निर्माण केले तर जिल्हातील प्रेक्षकांनी उपस्थित राहून खेळाडूंचे मनोबल वाढविले .

स्पर्धेच्या बक्षिसं वितरणा करीता प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा क्रीडा अधिकारी ,बुलढाणा श्रीमती भक्ती आंब्रे , राज्य क्रीडा मार्गदर्शक श्रीमती उज्वला लांडगे , अध्यक्ष बुलढाणा जिल्हा फुटबॉल संघटना श्री एस एस ठाकरे ,सचिव बुलढाणा जिल्हा फुटबॉल संघटना श्री एन आर वानखडे, उपमुख्याध्यापक उर्दू हायस्कूल ,बुलढाणा श्री दाऊद सर, उपाध्यक्ष ब्राईट क्रीडा व बहुउदेशीय संस्था श्री संजय भंडारी , कोषाध्यक्ष ब्राईट क्रीडा व बहुउद्देशीय संस्था श्री राजकुमार श्रीवास्तव उपस्थित होते . उपस्थित सर्व प्रमुख अतिथींचा जागतिक फुटबॉल दिन लोगोची फ्रेम देऊन सन्मान करण्यात आला , तर श्रीमती उज्वला लांडगे , श्री दाऊद सर, व श्री एन आर वानखडे यांनी उपस्थित खेळाडू ,माजी खेळाडू व पालक याना मोलाचे मार्गदर्शन केले व फुटबॉल या खेळाचे महत्व पटवून दिले . बुलढाणा जिल्हा मध्ये फुटबॉल या खेळाच्या विकासा करीता ज्यांनी मोलाचे योगदान दिले अश्या माजी फुटबॉल खेळाडूंचा जागतिक फुटबॉल दिन लोगोची फ्रेम देऊन सत्कार करण्यात आला .

या स्पर्धे मध्ये प्रथम क्रमांक बालाजी फुटबॉल क्लब बुलढाणा , दुसरा क्रमांक जिल्हा क्रीडा फुटबॉल प्रशिक्षण केंद्र,बुलढाणा व तृतीय क्रमांक बुलढाणा फुटबॉल क्लब, बुलढाणा या संघानी प्राप्त केला तर उत्कृष्ट खेळाडू म्हणून मोहम्मद उजैर रमीज राजा , नंदराज, सुलेक खान इरफान खान , फरहान ,वेदांत , देवांश ,अम्मार यांचा सन्मान करण्यात आला . विजयी संघाना चषक देऊन गौरविण्यात आले. स्पर्धे मध्ये सहभाग घेतलेल्या सर्व खेळाडूंना मेडल देऊन गौरविण्यात आले.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८